म. ग्रं. सं. ठाणें
विषय प्रू - प्रवास
सं. क्र. ५७
१९२८

REFBK-0003513
REFBK-0003513

म. ग्रं. स. टाण
ग्रं - प्रवास
नं. ५९०

...य पुस्तकमाला नं. २६

॥ श्री गुरुदेव दत्त प्रसन्न ॥

( चौथ्या इयत्तेकरितां )

मुंबई इलाख्याचें कारणिक वर्णन

अथवा

# प्रश्नोत्तर सोपें भूवर्णन

## भाग १ ला

लेखक व प्रकाशक

वामन विष्णु गोसावी हेडमास्तर
मु० पो० वळसंग जि० सोलापूर.

REFBK-0003513

सन १९२७ इसवी.

( सर्व हक्क पुस्तककर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत दोन आणे.

# प्रस्तावना.

हल्लीं भूगोलविषयक मोठमोठीं व विस्तारपूर्वक पुस्तकें मंजू असून इयत्ता ४ मधील लहान १० । ११ वर्षांच्या वयाच्या विद्यार्थ्यांच्य बुद्धीवर त्या मोठया बाडांचें दडपण जबरीनें लादलें जातें. त्यामुळें ओझे सहन न होऊन मुलें कुचंवली जाऊन नापास होतात. म्हणून आम्ह आपल्या मालेच्या पद्धतीस अनुसरून हें " प्रश्नोत्तर सोपें भूवर्णन भाग १ ला " छापविलें आहें.

ह्याची भाषा अत्यंत सोपी, चटकदार व मनोरंजक असून रचन साधी व डौलदार आहे. विषय कारणिक पण संक्षिप्त असल्यामुळे मुलांवर ओझें पडत नाहीं.

यांत मुंबई इलाख्याचें सामान्य वर्णन ( सीमा. हमामान, पिकें खनिज पदार्थ, उद्भिज पदार्थ, प्राणी, लोक, धर्म, पर्वत, नद्या, भूशिरें बेटें, आखातें इ० ) असून प्रांतवार व जिल्हेवार विशेष वर्णनही दिले आहे प्रसंगविशेषीं माहिती मनोरंजक व तुलनात्मक दिली आहे. कांहीं कांहीं माहिती तर इतर पुस्तकांपेक्षां जास्त व महत्त्वाची यांत दिली आहे हयामुळें वेळ, श्रम व पैसा कमी लागून भरपूर ज्ञान होऊन भूगोल विषयांत होणारी विद्यार्थ्यांचीं कत्तल वांचून खात्रीनें यश मिळेल. तरे सर्व शिक्षक व विद्यार्थी यास आश्रय देवोत.

पहिली आवृत्ति लवकरच खपल्यामुळें ही दुसरी आवृत्ति अशुद्धे दुरुस्त करून छापिली आहे.

२६५ सदाशिवपेठ पुणें. ( वामन विष्णु गोसावी.
१५।२।२७ ) पुस्तक कर्ता.

# मुंबई इलाख्याचें

# कारणिक वर्णन.

( सामान्य वर्णन )

प्रश्न १—मुंबई इलाखा कशाला म्हणतात ?

उत्तर—हिंदुस्थानच्या पश्चिमेकडच्या अरुंदपट्टीस मुंबई इलाखा म्हणतात

प्र० २—मुंबई इलाख्याच्या सीमा सांगा ?

3493

उ०—उत्तरेस पंजाब; पूर्वेस राजपुताना, मध्य हिंदुस्तान, मध्यप्रांत, वऱ्हाड व निजामाचें राज्य; पश्चिमेस आरबी समुद्र; दक्षिणेस म्हैसूर संस्थान व मद्रास इलाखा.

प्र० ३—मुंबई इलाख्याचें क्षेत्रफळ व लोकसंख्या किती आहे ?

उ०—क्षेत्रफळ १॥। लक्ष चौ० मैल, व लोकसंख्या २ कोटी.

प्र० ४—मुंबई इलाख्याचे विभाग सांगा ?

उ०—सिंध, कच्छ, गुजराथ, महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कानडा असे पांच विभाग आहेत. मुंबई बेट व शहर हा एक निराळाच विभाग आहे..

प्र० ५—मुंबई इलाख्यांत पर्वत कोणकोणते आहेत ?

उ०—सह्याद्रीची ओळ उत्तरेकडून दक्षिणेकडे गेली आहे; सातपुडा नर्मदा व तापी ह्यांच्यामध्यें पूर्वपश्चिम; गिरनार काठेवाडात; विंध्याद्रि गुजराथेंत; हाला सिंधूच्या पश्चिमेस. व आरवली गुजराथचे हद्दीस.

प्र० ६—मुंबई इलाख्यांतील डोंगर सांगा ?

उ०—१ कळसूबाईचा थळघाटाजवळ, २ अंजिठ्याचे डोंगर खानदेशाच्या दक्षिणेस, ३ चांदवाडचे डोंगर—नाशिक जिल्ह्यांत, ४ शंभू महा-

देवाचा डोंगर सातारा जिल्ह्यांत, ५ जोतिबाचा–कोल्हापुराजवळ, ६ राजपिंपळ्याचे डोंगर नर्मदा व तापी यांच्यामध्यें.

प्र० ७–मुंबई इलाख्यांतील घांट सांगा.

उ०––थळघांट–नाशिकाजवळ, बोरघांट–खंडाळ्याजवळ, पारघांट–महाबळेश्वराजवळ, कुंभारलीघांट–चिपळुणाजवळ, आंबेघांट–कोल्हापूर रत्नागिरी रस्त्यावर, वरंध्याघांट–महाडचे रस्त्यावर, किन्हईघांट बेळगांवाजवळ, आरबैलघांट–धारवाडाहून कारवार रस्त्यावर, देवीमणीघांट -सिरसीहून कुमठ्याचे रस्त्यावर.

प्र० ८–– डोंगर व पर्वत यांचा उपयोग काय ?

उ०—ओढे, नद्या यांचे उगम होतात,पर्वताची माती पावसानें खालच्या प्रदेशांत वाहात येऊन जमीन सुपीक होते; खनिज संपत्ति सांपडते, झाडी पुष्कळ होते; पर्वत ढग आडवितात व पाऊस पडतो; देशाच्या हद्दी ठरविण्यास व शत्रूस येण्यास प्रतिबंध करण्यास पर्वतांचा उपयोग होतो.

प्र० ९—मुंबई इलाख्यांतील आखातें सांगून त्यांचा उपयोग सांगा.

उ०—कच्छाचें व खंबायताचें. उपयोग-किनाऱ्यास खांचा पडून शिकांठीं चांगलीं बंदरें होतात.

प्र० १०—मुंबई इलाख्यांतील खाडया सांगा ?

उ०–वसईची, दाभोळची, बाणकोटची, देवगडची, विजयदुर्गची, जयगडची, दातिवऱ्याची व जैतापुरची

प्र० ११ —मुंबई इलाख्यांतील भूशिरें सांगा ?

उ०–केप मौंझ सिंधप्रांतांत केप जगत गुजराथेंत

प्र०१२– मुंबई इलाख्यांतील, धबधबे व त्यांचे उपयोग सांगा ?

उ०–घटप्रभेचा गोकाक शहराजवळ, २६० फूट उंच; शेरावतीचा गिरसप्पा येथें; नर्मदेचा मंडळा येथें. उपयोग-प्रवाहाच्या योगें वीज उत्पन्न करून कारखाने चालवितां येतात.

प्र० १३––मुंबई इलाख्यांतील रण, द्वीपकल्प व समुद्र सांगा ?

उ०–रण–कच्छाचें, द्वीपकल्प–काटेवाडचें, समुद्र आरबीसमुद्र.

प्र० १४–मुंबई इलाख्यांतील बंदरें सांगा.

उ०—मुंबई, कराची, कारवार हीं फार मोठीं बंदरें; पोरबंदर, मांडवी, घोघो, सुरत, उरण, बाणकोट, चिपळूण, रत्नागिरी, वेंगुर्लें, मालवण, कुमठा, होनावर, हर्णै, जयगड, गोवें, इ० लहान बंदरें आहेत.

प्र० १५--मुंबई इलाख्यांतील बेटें व त्यांचे उपयोग सांगा ?

उ०--मुंबई, साष्टी, घारापुरी, द्वारका, दीव, परीम, तुर्भे इ० उपयोग—बेटांवर दीपगृह बांधून जहाजांना रस्ता दाखवितां येतो. बेटांवर किल्ला बांधून आसपासच्या प्रांताचें रक्षण करितां येतें. बेटावरील लोक दर्यावर्दीपणांत धाडसी होतात.

प्र० १६–मुंबई इलाख्यांतील सरोवरें सांगा व त्यांचा उपयोग काय?

उ०—मंचर सिंधप्रांतात, सांबर गुजराथेंत; विहार, तुळसी, तानसा, हीं ठाणें जिल्ह्यांत. उपयोग-पाणी, मीठ, मासे मिळतात.

प्र० १७--मुंबई इलाख्यांतील थंड हवेचीं ठिकाणें सांगा ?

उ०--महाबळेश्वर, पांचगणी, सातारा जिल्ह्यांत; सिंहगड, पुरंदर, लोणावळें, खंडाळें. पुणें जिल्ह्यांत; अबूचा पहाड–गुजराथेंत; सप्तशृंग–नाशिक जिल्ह्यांत. माथेरान–ठाणें जिल्ह्यांत.

प्र० १८--मुंबई इलाख्याचें हवामान सांगा.

उ०--सिंध प्रांतांतील हवा उष्ण व कोरडी आहे. महाराष्ट्रांतील हवा साधारण उष्ण व कोरडी; कच्छ, काठेवाडांतील हवा फार उष्ण आहे. कोंकणांतील हवा उष्ण व दमट आहे.

प्र० १९--सम व विषम, दमट व कोरडी हवा म्हणजे काय ?

उ०—वेगवेगळ्या ऋतूंत ज्या हवेंत उष्णतामानांत फारसा फरक पडत नाहीं ती सम हवा; व फार फरक पडतो ती विषम हवा; ज्या हवेंत पाण्याची वाफ जास्त असते ती दमट हवा; व ज्या हवेंत वाफ कमी असते ती कोरडी हवा.

प्र० २०—मुंबई इलाख्यांत पाऊस कोठें व किती पडतो ?

उ०--सह्याद्रीच्या जवळच्या प्रदेशांत ८० इंच, सिंध प्रांतांत १० इंच.

प्र० २१—मुंबई इलाख्यांतील सुपीक व नापीक प्रदेश सांगा ?

उ०--सिंधू, नर्मदा, तापी यांच्या मुखाजवळचे प्रदेश फार सुपीक,

कृष्णा, गोदावरी सिंधू, यांच्या मध्यभागाचे प्रदेश मध्यम सुपीक, नद्यांच्या उगमाकडचे, वाळवंटाचे व कोंकणांतील नद्या लहान म्हणून तेथचे प्रदेश कमी सुपीक.

प्र० २२—मुंबई इलाख्यांतील कोणत्या जिल्ह्यांत कोणतीं पिकें होतात?

उ०—पुणें, सातारा, सोलापूर, खानदेश—बाजरी, ज्वारी, ऊंस, भुईमूग, तूर, करडी, अंबाडी, जवस, हरभरा, गहूं. पुणें, कारवार, कोंकण तांदुळ वरी. सिंध, गुजराथ, खानदेश, नगर, धारवाड—कापूस; ठाणें—केळीं; नाशिक—द्राक्षें; कारवार, धारवाड, कोंकण—तांदूळ, नारळ, सुपारी.

प्र० २३—मुंबई इलाख्यांत प्राणी कोणते आहेत ?

उ०—बैल, घोडे, रेडे, म्हशी, गाई, मेंढरें, उंट, गाढवें, लांडगे, वाघ, तरस, कोल्हे, खोकड, माकड, वानर, ससे, हरीण, वाघ, इ०.

प्र० २४—मुंबई इलाख्यांतील झाडें सांगा ?

उ०—इमारतीचीं—बाभूळ, लिंब, जांभूळ, साग, खैर इ०.

फळझाडें—आंबे, फणस, केळीं, द्राक्षें, नारळ, सुपारी, चिंच इ०

प्र० २५—मुंबई इलाख्यांत कोठें व कोणते खनिज पदार्थ सांपडतात?

उ०—लोखंड व मॅंगॅनीज बेळगांव, धारवाड व कारवार जिल्ह्यांत; सोनें धारवाड जिल्ह्यांत; रुपें—कच्छप्रांत; शाहाबाहीदगड—पोरबंदर.

प्र० २६...मुंबई इलाख्यांतील नद्या सांगून त्यांचें वर्णन करा ?

उ०—सिंधप्रांतांत सिंधू, गुजराथेंत नर्मदा, तापी, साबरमती, मही; महाराष्ट्रांत—कृष्णा, भीमा, गोदावरी; दक्षिमहाराष्ट्रांत—घटप्रभा, मलप्रभा, वर्धा, शेरावती, तुंगभद्रा इ०

नद्यांचीं वर्णनें:—१ सिंधू—हिमालयांत मानस सरोवराजवळ उगम पावून पंजाब व सिंधप्रांत यांतून वहात जाऊन आरबी समुद्रास मिळते. कांठीं गांवें—सक्कर, रोरी, हैद्राबाद. मिळणाऱ्या नद्या—पंचनदी ( जेहलम, चिनाब, रावी, बियास व सतलज मिळून झालेली ) सिंधूची लांबी १८०० मैल. २ नर्मदा—ही मध्यप्रांतांत अमरकंटक पर्वतांत उगम पावून खंबायतचे—आखातास मिळते. हिचें कांठीं भडोच शहर आहे. लांबी ८०१ मैल. हिजमधून १०० मैल पर्यंत जहाजें जातात. ३ तापी—ही सातपुड्यांत

बेतुल गांवाजवळ उगम पावून सुरतेजवळ खंबायताचे आखातास मिळते. कांठीं गांवें प्रकाशें, सारंगखेडें, सुरत. मिळणाऱ्या नद्या—पूर्णा, गिरणा, मांजरा, लांबी ४४१ मैल. साबरमती—ही राजपुतान्यांत अरवली पर्वतांत उगम पाऊन खंबायतच्या आखातास मिळते. कांठीं गांव अमदाबाद. लांबी २०० मैल.

५ मही—ही माळव्याचे उंच प्रदेशांत उगम पावून खंबायताच्या आखातास मिळते. कांठीं गांव—खंबायत. मिळणाऱ्या नद्या—शेढी, वात्रक, मेश्वो, लांबी २५० मैल. ६ कृष्णा—ही महाबळेश्वराचे डोंगरांत उगम पावून मुंबई इलाखा, निजामचें राज्य व मद्रास इलाख्यांतून वाहात जाऊन मच्छ-लीपट्टणाजवळ बंगालच्या उपसागरास मिळते. कांठी गांवें—वाई, माहुली, कऱ्हाड, सांगली. मिळणाऱ्या नद्या—वेण्या, कोयना, पचगंगा, भीमा, वारणा, घटप्रभा, मळप्रभा, तुंगभद्रा इ०—लांबी ८०० मैल. ८ भीमा-ही भीमाशंकरच्या डोंगरांत उगम पावून निजामाच्या राज्यांत कृष्णेस मिळते. कांठीं गांवें—नरसिंहपूर, पंढरपूर; मिळणाऱ्या नद्या—निरा, सिना, मुळा इ. लांबी ५०० मैल ८ **गोदावरी**—ही सह्याद्रींत त्र्यंबकेश्वराजवळ उगम पावून पूर्वेकडे निजामाचें राज्य व मद्रास इलाखा यांतून वहात जाऊन बंगालचे उपसागरास मिळते. कांठीं गांवें—त्र्यंबक, नाशिक, पैठण. मिळणाऱ्या नद्या—प्रवरा, मांजरा, वर्धा, पैनगंगा. लांबी—८९८ मैल.

प्र० २८—मुंबई इलाख्यांतील चारी दिशांस वाहणाऱ्या नद्या सांगा?

उत्तर वाहिनी—खारी, कच्छांत; पूर्व वाहिनी—कृष्णा, गोदावरी, भीमा, दक्षिणवाहिनी—सिंधू, साबरमती, मही व लुनी; पश्चिमवाहिनी—नर्मदा, तापी, शरावती.

प्र० २८—बंगालचा उपसागर, आरबी समुद्र, कच्छाचें आखात व खंबायतचें आखात यांस मिळणाऱ्या नद्या सांगा ?

उ०—बंगालचे उपसागरास--गोदावरी, कृष्णा; आरबी समुद्रास--सिंधु नर्मदा, तापी, साबरमती, मही, शरावती इ० कच्छाचे आखातास-नागमती, रुक्मावती व लुनी; खंबायतचें आखातास-नर्मदा, तापी, साबरमती मही.

प्र० २९-गोदावरी व कृष्णा यांची तुलना करा व नद्यांचा उपयोग सांगा.

उ०-साम्य-दोहींचा उगम सह्याद्रींत आहे; दोन्ही पूर्वेकडे वाहातात; दोन्ही बंगालच्या उपसागरास मिळतात. भेद-गोदावरी जास्त लांब आहे, गोदावरीचा प्रवाह जास्त संथ आहे.

नद्यांचा उपयोग-पाणी पिण्यास, धुण्यास, कालवे काढून शेतीस पाणी देतां येतें. कांठीं झाडें होतात, नदीकांठच्या जमीनींत गाळ सांचून चांगले पीक येतें सरहद्दी ठरविण्यास व जहाजांनीं नेआण करण्यास उपयोग होतो

प्र० ३०-मुंबई इलाख्यांत कोणकोणत्या नद्यांस कालवे आहेत ?

उ०-सिंधु कृष्णा, नीरा, मुळा, मुठा, ( कालव्याचा उपयोग शेतीस पाणी देण्यास चांगला होतो शिवाय पिण्यास व धुण्यास. )

प्र० ३१—मुंबई इलाख्यांतील उद्योगधंदे व कारखाने सांगा

उ०—शेतकी हा मुख्य धंदा आहे. शिवाय-मुंबई, अमदाबाद, सोलापूर, जळगांव, बार्शी येथें कापडाच्या गिरण्या आहेत. मुंढव्यास कागदाची गिरणी, व लोंकर रेशीम तयार करण्याची गिरणी आहे. बडोदें, तळेगांव. ओगलेवाडी येथे कांचेचे कारखाने आहेत. किर्लोस्करवाडी-येथें लोखंडाचा कारखाना, टिकेकरवाडी-सुधारलेल्या हातमागचा कारखाना; पुणें, नाशीक, सांगली भांड्यांचा कारखाना आहे.

प्र० ३२-मुंबई इलाख्यांतील प्रसिद्धीचीं ठिकाणें सांगा ?

उ०-मुंबई-इलाख्यांची राजधानी व हिंदुस्थानांत मोठें बंदर. कराची-सिंध प्रांतांत मोठें बंदर. हैदराबाद-उत्तम गालींचे होतात. कच्छ-सोन्यारुप्याचीं कामें चांगलीं होतात. काठेवाड-घोडे मोठे निपजतात. खाराघोडा -मिठाचा कारखाना आहे. अहमदाबाद-किनखाब, रेशीमकांठीं धोतरें व लुगडीं चांगलीं होतात. सुरत-इंग्रजांनीं इ स. १६१२ त पहिली वखार घातली. कपडवंज-ग्लास व साबणाचे कारखाने आहेत. डाकूर-रणछोडजीचें देवालय. वसई-साखरेचे कारखाने. आगाशी-सुकेळीं चांगलीं होतात. घारापुरी-कोरीव लेणीं पुणें-पेशव्यांची राजधानी. सातारा शिवाजीच्या वंशाची राजधानी. विजापूर-गोलघुमट व इमारती पाहण्यासारख्या

आहेत. जुन्नर—सुडाचे कागद होतात, येवलें—पीतांबर, पागोटीं, चांगलीं होतात. पंढरपूर—विठोबाचें प्रख्यात देवस्थान आहे. द्वारका, त्र्यंबकेश्वर—येथें प्रसिद्ध देवस्थानें आहेत. गोकाक—लाकडी रंगीत फळें हुबेहुब करितात. सांवतवाडी—गंजिफा, खेळाचे रंगीत सामान तयार करितात. जेजुरी—खंडोबाचें स्थान प्रसिद्ध आहे. कल्याण, भुसावळ, लोणावळें—येथें रेल्वे कंपनीचे मोठे कारखाने आहेत.

प्र० ३३—विद्यालयाकारितां मुंबई इलाख्यांत प्रसिद्ध शहरें कोणतीं ?

उ०—पुणें, मुंबई, धुळें अहमदाबाद, बडोदें, कोल्हापूर, धारवाड, सांगली इ० शहरें विद्यालयाकरितां प्रसिद्ध आहेत. ( येथें पाठशाळा व कॉलेजें आहेत. )

प्र० ३४—मुंबई इलाख्यांतील क्षेत्रें सांगा ?

उ०—वाई, माहुली, कऱ्हाड, पंढरपूर, नाशिक, त्र्यंबक, द्वारका, पैठण इ०

प्र० ३५—मुंबई इलाख्यांतलि पोर्तुगीज लोकांचीं ठाणीं सांगा ?

उ०—गोवें, दमणः व दीव.

प्र० ३६—मुंबई इलाख्यांतील संस्थानें व जहागिरी सांगा ?

उ०—खैरापूर, बडोदें, खंबायत, जव्हार, जंजिरा, सांवतवाडी, कच्छ, अक्कलकोट, कोल्हापर, पालनपूर हीं संस्थानें व औंध, भोर, फलटण, जत, सांगली, मिरज, कुरुंदवाड, मुधोळ, रामदुर्ग, जमखिंडी, सावनूर, इ० जाहागिरी आहेत.

प्र० ३७—मुंबई इलाख्यांतील एजन्सी सांगा ?

उ०—पालनपूर, महीकाठा; रेवाकांठा, काठेवाड, सुरत, पंचमाहाल, खानदेश एजन्सी.

प्र० ३८—मुंबई इलाख्यांतील फौजेचीं ठाणीं सांगा ?

उ०—जाकोबाबाद, कराची, मालेगांव, भगूर, डीसा, खडकी, घोरपडी, वानवडी, अहंमदनगर, मुंबई.

प्र० ३९—मुबई इलाख्याचा व्यापार सांगा ?

उ०—आयात व निर्यात माल १०० कोटीच्यावर आहे. आयात माल—सोनें, रुपें, यंत्रें, साखर, राकेल, कागद, दारू, औषधें, कापड,

छत्र्या, रंगाचे डबे इ० व निर्यातमाल–कापूस, गहूं, तांदूळ, कातडीं लोकर, करडी, भुइमूग इ०

प्र० ४०–– मुंबई इलाख्यातील दळणवळणाचीं साधनें सांगा ?

उ०–बैलगाडीचे रस्ते, आगगाड्या, आगबोटी, मोटारगाडया, पोष्ट-ऑफिसें, तार ऑफिसें.

प्र०४१–– मुंबई इलाख्यांतील धर्म सांगा ?

उ०–हिंदू, मुसलमानी, यहूदी, खिस्ती, पारशी, जैन.

प्र० ४२–मुंबई इलाख्यांतील भाषा सांगा ?

उ० सिंधप्रांतांत सिंधी, काठेवाड व गुजराथेंत––गुजराथी; महाराष्ट्रांत–मराठी, दक्षिण महाराष्ट्रांत–कानडी, कच्छांत–कच्छी.

प्र० ४३––मुंबई हलाख्यांत शिक्षणाची सोय काय केली आहे !

उ०––पूर्वीं क्वचित् ठिकाणीं सरकारी शाळा असत. आतां ५०० लोकसंख्येच्या खेडयापाडयांनीं सुद्धां प्राथमिक शिक्षणाच्या शाळा आहेत. व लवकरच सक्तीचें व मोफत शिक्षण सुरूं होईल. दुय्यम व उच्च शिक्षणाचीही मोठमोठया शहरीं सोय केली आहे. कोठेंकोठें धंदे शिक्षणही मिळूं लागलें आहे.

प्र० ४४– मुंबई इलाख्यांतील रेल्वेचे रस्ते सांगा ?

उ०–१ ग्रेट इंडियन पेनिन्शुला रेल्वे–हिचे दोन फांटे आहेत. पहिल्याचे माथेरान रेल्वे, बार्शी लाइट रेल्वे व दौंड बारामती असे दोन तीन फांटे; व दुसऱ्याचे धुळें–चाळीसगांव रेल्वे, दौंड–मनमाड रेल्वे, भुसावळ–नागपूर रेल्वे व जळगांव अमळनेर रेल्वे, असे चार फांटे आहेत. २ धी बांबे बडोदा आणि सेंट्रल इंडिया रेल्वे ·मुंबईंत कुलाब्यापासून वाढवाण––खाराघोडा पर्यंत. ३ तापी व्हाली रेल्वे सुरत ते अमळनेर पर्यंत. ४ गोदावरी व्हॅली रेल्वे–मनमाड ते हैद्राबाद पर्यंत ५ राजपुताना रेल्वे ६ नार्थ वेस्टर्न रेल्वे–कराची ते कटयापर्यंत ७ सदर्न मराठा रेल्वे–पुण्यापासून लोंढयापर्यंत. ८ भावनगर, गोंडाल, जुनागड, पोरबंदर रेल्वे–भावनगर ते वाढवाणपर्यंत

प्र० ४५ मुंबई इलाख्याची राज्यव्यवस्था सांगा ?

उ०––इलाख्याचे मुख्य अधिकारी गव्हर्नर साहेब आहेत. त्यांचे मद-

तीस दोन कौन्सिलें ( सभा ) आहेत. या कौन्सिलांच्या साह्यानें मुलकी, दिवाणी, पोलीस, आरोग्य, शिक्षण वगैरे खात्यांची व्यवस्था त्या त्या खात्यांचे अधिकारी पाहातात. शेतकी, आरोग्य, शिक्षण व अबकारी वगैरे खातीं तीन दिवाणांकडे सोपविलीं आहेत.

---

## विशेष वर्णन.

प्र० ४६—मुंबई इलाख्याचे राजकीय विभाग कोणते ?

उ०—१ सिंध, २ उत्तरभाग, ३ मध्यभाग, ४ दक्षिणभाग व ५ मुंबई बेट.

प्र० ४७—सिंधप्रांतांतील पाऊस, सुपीकता व पिकें सांगा ?

उ०—पाऊस थोडा पडतो, पण सिंधूच्या पुरामुळें आणि कालव्यामुळें उत्तम पिकें येतात. पिकें—गहूं, बटाटे, कापूस.

प्र० –४८ सिंधप्रांतांतील जिल्हे व संस्थानें सांगा ?

उ०—जिल्हे—अपर सिंध फ्रांटियर, शिकारपूर, कराची, हैद्राबाद, थर आणि पारकर. संस्थान—खैरपूर.

प्र० ४९—सिंधप्रांतांतील जिल्हेवार मोठीं शहरें व त्यांची *प्रसिद्धी सांगा.

उ० १. अपरसिंध फ्रांटियर जिल्ह्यांत ३ तालुके असून जाकोबाबाद हें मोठें शहर फौजेच्या छावणीबद्दल प्रसिद्ध आहे. २ शिकारपूर जिल्ह्यांत १७ तालुके, आहेत. मोठीं गांवें—शिकारपूर, सक्कर. ३ कराची जि० त १३ तालुके मोठीं गांवें—कराची. ठठ्ठा कोत्री, ४. हैद्राबाद जि०त—१३ तालुके आहेत. मोठीं गांवें—हैद्राबाद, मियानी. ५. थर आणि पारकर जिल्ह्यांत ७ तालुके आहेत.

प्र० ५०—कच्छ प्रांताची माहिती सांगा ?

उ०—मोठीं गांवें—राजधानी भूज, पूर्वी येथें भूकंप झाला होता.

---

*प्रश्न ३१ व ३२ यांत न आलेल्या प्रसिद्ध शहरांची प्रसिद्धी येथें दिली आहे.

मांडवी—मोठें बंदर व येथें दीपग्रह आहे. भद्रेश्वर, केरा, कंथकोट हीं मोठीगांवें व मुंद्रा, लखपट हीं बंदरें आहेत. नद्या—नागमती, रुक्मावती खारी, लुनी. पर्वताचीं शिखरें—काळो, धिणोधर, ननामो; व्यापाराचे जिन्नस—तेल, तूप, धान्य, बैल, म्हशी.

प्र० ५१—गुजराथ प्रांतांतील जिल्हे सांगा.

उ०—अमदाबाद, खेडा, पंचमहाल, भडोच, सुरत.

प्र० ५२—गुजराथेंतील जिल्हेवार मोठीं गांवें सांगा ?

उ०—१ अहमदाबाद जि० त—प्रांतीज, अमदाबाद, विरमगाव, धोलका, घोघो; २ खेड जि० त कपडवंज; ठासरा, नडियाद, आनंद, डाकूर इ० ३ पंचमहाल जि० त गोद्रा, कलाल, दोहोद ४ भडोच जि० त—भडोच, अंकलेश्वर, जंबुसर इ० सुरत जि० त—सुरत, मांडवी, रांदेर, पारडी, इ०

प्र० ५३—गुजराथेंतील नद्या सांगा ?

उ०—नर्मदा, तापी, साबरमती, मही, शेढी, पूर्णा,

प्र० ५४ गुजराथेंतील व्यापाराचे जिन्नस सांगा.

उ०—लुगडीं, धोतरजाडे, किनखाब, धान्य, ग्लास, साबण इ०

## महाराष्ट्र व कोंकण.

प्र० ५५—देशाचें सामान्य वर्णन करा.

उ०—पूर्वभाग सपाट, मध्यभाग डोंगर कमी व पश्चिम भाग डोंगर व झाडी जास्त असा आहे. पाऊस पूर्वभागीं २०, मध्यभागीं ३० व मश्चिमभागीं ४० इंच पाऊस पडतो. **हवा**—पूर्वभागीं फार उष्ण, मध्यभागीं साधारण उष्ण, व पश्चिमभागीं कमी उष्ण. **पिकें**—ज्वारी, बाजरी, कापूस, तांदूळ, गहूं. इ०

प्र० ५६—देशांतील जिल्हे व संस्थानें सांगा ?

उ०—पुणें, सातारा, सोलापूर, अहमदनगर, नाशीक, पूर्वखानदेश व पश्चिम खानदेश, संस्थानें—डांगदेश, सुरगणा, मेवासीप्रांत, औंध, भोर, जत, अक्कलकोट, फलटण.

प्र० ५७—जिल्ह्यांचीं वर्णनें करा ?

उ०—१ देश **पुणें जिल्हा**—मोठीं गावें—पुणें, बारामती—व्यापाराची व गुळाची पेठ. लोणावळें व खंडाळें—थंड हवेचीं ठिकाणें; कार्लें—कोरींव

लेणीं आहेत; जेजूरी—खंडोबाचें देऊळ पाहण्यासारखें आहे; आळंदी—ज्ञानेश्वराची समाधि आहे; देहू—तुकारामाची समाधि आहे; जुन्नर—सुडा-चे कागद होतात. सिंहगड डोंगरी किल्ला आहे; शिवनेरी--शिवाजीची जन्मभूमी; कोरेगांव—फौजेची छावणी; भीमाशंकर -महादेवाचें लिंग आहे. **नद्या**—भीमा, निरा, इंद्रायणी, घोडनदी, मुळा, मुठा, कर. इ० व्यापाराचे जिन्नस—तांब्यापितळेचीं भांडीं, जरीचें कापड, लुगडीं, पीतांबर, गूळ, तांदूळ, बटाटे इ० संस्थान—भोर.

२ **सातारा जिल्हा**- मोठीं गांवें—सातारा, वाई, कऱ्हाड, तासगांव, इसलामपूर, अष्टें, विटें, रहिमतपूर, भिलवडी, म्हसवड, कोरेगांव, खटाव, मायणी इ. सज्जनगड ( परळी )–रामदास स्वामीची समाधि आहे. धोम—नरसिंहाचें स्थान आहे. वाई व कऱ्हाड ही कृष्णेच्या कांठीं क्षेत्रें आहेत. पांचगणी–थंड हवेचें ठिकाण. लिंब—पेरू चांगले होतात. बुधपांचेगांव—आंबे उत्तम होतात. **संस्थानें**—औंध, फलटण; **नद्या**—कृष्णा, वेण्या, कोयना, वारणा, माण, तारळी उरमोडी इ०; **व्यापाराचे जिन्नस**—ज्वारी, बाजरी, तांदूळ, गूळ, हळद, भुईमुग, मिरची इ०

३ **सोलापूर जिल्हा**—मोठीं गांवें—सोलापूर, पंढरपूर, बार्शी माढें, करमाळें, सांगोलें, अकलूज, मोहोळ, वैराग, टेंभुर्णी. बार्शी—कापसाचा मोठा व्यापार चालतो. अकलूज—व्यापाराची उतारपेठ आहे. संस्थान—अक्कलकोट; **नद्या**—निरा, भीमा, सीना, भोगावती व माण; **व्यापाराचे जिन्नस** ज्वारी, कापूस, कापड, गळिताचीं धान्यें इ०

४ **अहमदनगर जिल्हा**—मोठीं गांवें अहमदनगर—भुईकोट किल्ला व चांदबिबीचा महाल आहे. कोपरगांव—ऊंस फार पिकतो. व राघोबा दादा पेशव्यांचा वाडा आहे. खर्डे—निजाम व मराठे यांची लढाई झाली. संगमनेर—अनंतफंदीचें राहण्याचें ठिकाण. व लुगडीं आणि पितळेचें सामान चांगलें होतें. पुणतांबें—चांगदेव साधूची समाधि आहे. शिवाय—अकोले, जामखेड, नेवासें, श्रीगोंदें, राहूरी इ० मोठीं गांवें आहेत. नद्या—सीना, प्रवरा, गोदावरी; **व्यापाराचे जिन्नस**—लुगडीं धान्य इ०

५ नाशिक जिल्हा—मोठीं गांवें नाशीक-क्षेत्र आहे व येथें तांब्याचीं व पितळेचीं भांडीं चांगलीं होतात. येवलें—कद, पीतांबर व पागोटीं

चांगलीं होतात; इगतरी—थंड हवेचें ठिकाण. मनमाड—रेल्वे जंक्शन आहे. पंचवटी—श्रीराम वनवासांत असतां येथें राहिले होते. त्रंबकेश्वर—गोदावरीचा उगम व त्र्यंबकेश्वराचें देऊळ आहे. शिवाय—कळवण, दिंडोरी, नांदगांव, मालेगांव, निफाड, सिन्नर, इगतपुरी इ० मोठीं गावें आहेत. नद्या—गोदावरी; **व्यापाराचे जिन्नस**-धान्य, पितळेचीं भांडीं, द्राक्षें, रेशमी कापड.

६ **पश्चिम खानदेश जिल्हा**—मोठीं गांवें—धुळें—कापसाचा मोठा व्यापार चालतो व कापसांतील सरकी काढण्याच्या गिरण्या आहेत. तळोदे—लांकडाचा मोठा व्यापार चालतो. शिवाय—शिरपूर, नवापूर, शहादें, नंदुरबार हीं मोठीं गांवें आहेत. **संस्थानें**—डांगदेश, मेवासी प्रांत. **पिकें**—कापूस, बाजरी; व्यापार—कापूस; लाकूड मध.

७ **पूर्वखानदेश जिल्हा**—मोठीं गांवें—जळगांव—कापडाच्या गिरण्या आहेत व व्यापाराची पठे आहे भुसावळ—रेल्वे जंक्शन आहे. अमळनेर—सुती कापडाच्या गिरण्या आहेत. चोपडें—ऊन पाण्याचे झरे आहेत. फैजपूर—व्यापाराची पेठ व रंगीत पासोडया व लुगडीं चांगलीं होतात. चाळिसगांव-येथून धुळयास जाणारा आगगाडीचा फाटा निघाला आहे. पिकें-मुख्य पीक कापूस. इतर पिकें ज्वारी, बाजरी. **कारखाने**—कापसाच्या गिरण्या २ व सरकी काढण्याच्या गिरण्या १३९ आहेत.

**कोंकण** ( कोंकणांत—-ठाणें, कुलाबा व रत्नागिरी हे ३ जिल्हे आहेत ) **ठाणें जिल्हा**—मोठींगावें—ठाणें—जिल्ह्याचें ठिकाण आहे. वसई—साखरेचे कारखाने आहेत व किल्ला आहे. कल्याण रेल्वेजंक्शन आहे. आगाशी—सुकेळीं होतात. वज्रेश्वरी—ऊन पाण्याचे झरे आहेत, देवीचें स्थान प्रसिद्ध आहे. कानेरी-कोरींव लेणीं आहेत. शिवाय—उंबरगांव, मोरवाडे, माही, साष्टी, भिवंडी हीं मोठीं गांवें आहेत. **खाड्या**—वसईची, दातिवऱ्याची; **व्यापाराचें जिन्नस** मीठ.सुकेळीं; **तलाव**—विहाड, तुळशी, तानसा. याचें पाणी मुंबईस नेलें आहे. संस्थान जव्हार

२ **कुलाबा जिल्हा**—ह्या जिल्ह्यांत मोठीं गांवें—अलिबाग हें जिल्ह्याचें ठिकाण,ही पूर्वी आंग्रयाची राजधानी होती,येथें उत्तम किल्ला आहे,घारापुरी-

3493

कोरींव लेणीं आहेत. प्रतापगड—किल्ला व देवीचें देऊळ आहे प्रतापगडा जवळच शिवाजीनें अफजुलखानास ठार मारिलें. रायगड—शिवाजींची समाधि आहे. पनवेल—औषधांचा कारखाना आहे. शिवाय—महाड, पेण, रोहें, कर्जत, उरण हीं मोठीं गांवें आहेत. खाडया—बाणकोटची, रोह्याची नागोठाण्याची. **व्यापाराचे जिन्नस**—तांदूळ, नारळ, सुपारी, सुंभ. इ० संस्थान—जंजीरा.

३ **रत्नागिरी जिल्हा**—मोठीं गांवें—रत्नागिरी—जिल्हाचें ठिकाण, लांकडी सामान तयार करण्याची शाळा. चिपळूण—बंदर व परशुरामाचें देऊळ आहे. मालवण व वेंगुर्ले बंदरें असून मोठा व्यापार चालतो. राजापूरीं एकाएकी गंगा येते व ऊन पाण्याचे झरे आहेत. आंजर्ले—औषधी कारखाना आहे. शिवाय—दापोली, खेड, देवगड, गुहागर, देवरुख हीं मोठीं गांवें आहेत. संगमेश्वर येथें संभाजीस औरंगजेबाचा सरदार तकरीबखान यानें धरलें. **व्यापाराचे जिन्नस**—तांदूळ, मीठ, नारळ, सुपारी इ०.

**दक्षिणमहाराष्ट्र व उत्तर कानडा—१ विजापूर—जिल्हा**—मोठीं गांवें विजापूर—गोलघुमट, जुम्मामशीद इ० इमारती पाहण्यासारख्या आहेत. इरकल-लुगडीं व चोळखण चांगले होतात. तालीकोट—राजारामाची राजधानी होती शिवाय—बागलकोट, बदामी, शिंदगी, इंडी इ० मोठीं गांवें आहेत. **संस्थान**—जत; **नद्या**—कृष्णा, भीमा, घटप्रभा; मलप्रभा; **व्यापाराचे जिन्नस**—धान्य, लुगडीं, चोळखण इ०

२ **बेळगांव जिल्हा**—मोठीं गांवें-बेळगांव थंड हवेचें ठिकाण. संकेश्वर—हिंदूंचे धर्मगुरू शंकराचार्य यांचा मठ आहे. शिवाय—चिकोडी, खानापूर, गोकाक, अथणी, हुकेरी इ० मोठीं गांवें आहेत नद्या—कृष्णा, घटप्रभा, मलप्रभा; **व्यापाराचे जिन्नस**—कापड, रेशीम, धान्य, मातीचीं-भांडी, लांकडीं फळें इ०

३ **धारवाड जिल्हा**—मोठीं गांवें—धारवाड—जिल्हाचें ठिकाण व चोळखण चांगले होतात. हुबळी—सुपारी चांगली होते व रेल्वेजंक्शन आहे. शिवाय—राणीबिन्नुर, नवलगुंद, रोण, बंकापूर, आणेगिरी, गजेंद्रगड, हावेरी इ० मोठीं गांवें आहेत. खाणी—सोन्याच्या, लोखंडाच्या व मॅंगनी-

जच्या खाणी आहेत. **नद्या**—तुंगभद्रा, मलप्रभा; **व्यापाराचे जिन्नस** नारळ, सुपारी.

४ **कारवार जिल्हा**–मोठी गांवें–कारवार–जिल्हाचें ठिकाण व उत्तम बंदर आहे, गोकर्णमहाबळेश्वर—पवित्रक्षेत्र आहे. शिरसी–सुपारी व वेलदोडे यांचें उत्पन्न फार होतें. शिवाय–कुमटा, होनावर, सिद्धापूर, गिरसप्पा हीं मोठीं गांवें आहेत. **नद्या**—वर्धा, शरावती; **व्यापाराचे जिन्नस**–सागवान, सुपारी, वेलदोडे, धान्य, कापड इ०

## एजन्सीचें सामान्य वर्णन.

१ **काठेवाड प्रांत**–यांत मुख्य ४ प्रांत आहेत ते झालवाडा, सोराथ, गोहिलवाडा, हालद. मोठीं गांवे–राजकोट–कुमार कॉलेज आहे. द्वारका–श्रीकृष्णाची जन्मभूमि आहे. भावनगर कापसाची पेठ आहे. सोमनाथ–महादेवाचें प्रसिद्ध देऊळ आहे. हे गिझनीच्या महंमदानें लुटलें होतें. जाफराबाद–मोठमोठया म्हशी निपजतात. पोरबंदर–पोरबंदरीं दगड सांपडतात. शिवाय–ध्रांगद्रा, वढवाण, पालीठाणा, गोंडल हीं मोठीं गांवें आहेत. काठेवाडांतील घोडे प्रसिद्ध आहेत. **व्यापार**–कापूस, तेल, घोडे. **पर्वत**–गिरनार–३॥ हजार फूट उंच असून थंड हवेचें ठिकाण आहे.

२ पालनपूर एजन्सी—मोठीं गांवें–पालनपूर. राधनपूर, डिसा.

३ महिकाटा एजन्सी–मोठीं गांवें–ईदर, सादरा, दाटा. याच्या उत्तरेस अबूचा पहाड असून तेथील हवा थंड आहे.

४ रेवाकाटा एजन्सी–मोठीं गांवें–राजपिंपळा, छोटाउदेपूर.

५ पंचमहाल एजन्सी—मोठीं गांवें–नारूकोट.

६ सुरत एजन्सी—मोठीं गांवें—सचीन, वासदा, धरणपूर.

खानदेश एजन्सी–याचे ३ भाग आहेत ते–डांगदेश, सुरगण, मेवासी.

## ८ संवस्थानांचें सामान्य वर्णन.

१ खैरपूर–हें सिंधप्रांतांत असून मिरअल्ली मुरादचे ताब्यांत आहे.

२ बडोदें–हें गायकवाडचे ताब्यांत आहे. यांत मोठीं गांवें–बडोदें, नवसरी, पट्टण, कडी, तेलारी, द्वारका, गणदेवी इ०

३ खंबायत—हें अमदाबाद जिल्ह्यांत असून मोगल घराण्यांतील राजाचे ताब्यांत आहे. मुख्य शहर—खंबायत.

४ जव्हार—ठाणे जिल्ह्यांत असून कोळी राजाचे ताब्यांत आहे.

५ जंजिरा—हें रत्नागिरी जिल्ह्याचे उत्तरेस असून शिद्दी नबाबाचे ताब्यांत आहे. मोठें गांव—जंजिरा, मुरुड.

६ सांवतवाडी—हें रत्नागिरी जिल्ह्यांत असून भोसल्यांचे ताब्यांत आहे. मोठें गांव—सांवतवाडी, कुडाळ. व्यापार—रंगीत सामान, नारळ, वरी.

७ अक्कलकोट संस्थान—हें सोलापूर जिल्ह्यांत असून भोसल्यांचे ताब्यांत आहे. मोठें गांव—अक्कलकोट, नागणसूर, मंगळूर.

कोल्हापूर—हे शिवाजीच्या वंशजांचे ताब्यांत आहे.

## ११ जहागिरी.

औंध, भोर, फलटण, जत, सांगली, मिरज, कुरुंदवाड, जमाखिंडी, मुधोळ, रामदुर्ग, सावनूर ह्या जहागिरी आहेत

## हिंदुस्थानचें सामान्य वर्णन.

आशिया खंडाच्या दक्षिणेस जीं तीन द्वीपकल्पें आहेत त्यांतील मधलें मोठें द्वीपकल्प हिंदुस्थान होय. या देशाला हिंदुलोक **आर्यावर्त** व नंतर **भारतवर्ष** म्हणत परंतु पुढें इराणी लोकांनीं या देशास हिंदुस्थान ( हिंदूचें स्थान ) हें नांव दिलें. हल्लीं इंग्रज लोक या देशाला इंडिया म्हणतात.

प्र०—५८ हिंदुस्थानच्या सीमा सांगा ?

उ०—उत्तरेस हिमालय, काराकोरम व हिंदुकुश हे पर्वत व पलीकडे तुर्कस्थान व तिबेट हे देश आहेत. पूर्वेस—आराकानचे व ब्रह्मदेशांतील डोंगर व बंगालचा उपसागर. दक्षिणेस—हिंदी महासागर. पश्चिमेस—आरबी समुद्र, हाला, सुलेमान पर्वत.

प्र०—५९ हिंदुस्थानचें क्षेत्रफळ, लोकसंख्या सांगा ?

उ०—क्षेत्रफळ १७॥ लक्ष चौरस मैल ( मुंबई इलाख्याच्या ८ पट ) लोक संख्या ३१ कोटी ९० लक्ष.

प्र० ६०—हिंदुस्थानचे किनारे कोणते ?

उ०—पश्चिमेकडील तो मलबार व पूर्वेकडील तो कारोमांडल किनारा.

प्र० ६१—हिंदुस्थानांतील आखातें, उपसागर व सामुद्रधुन्या सांगा.

उ०—आखातें—कच्छचें, खंबायतचें व मानारचें; उपसागर—बंगालचा उपसागर. सामुद्रधुन्या पाल्कची व पांबेनची.

प्र० ६२—हिंदुस्थानांतील बेटें सांगा ?

उ०—सीलोन, रामेश्वर, मानार, हिंदुस्थानच्या दक्षिणेस; लखदीव, मालदीव, आरबी समुद्रांत; आंदमान, निकोबार बंगालच्या उपसागरांत. अंदमान बेट येथें काळ्या पाण्याच्या शिक्षेचे कैदी पाठवितात.

प्र० ६३—हिंदुस्थानांतील भूशिरें सांगा ?

उ० —मॉंझ, कामोरिन, कॉलेमिया, व पालमिरस.

प्र० ६४—हिंदुस्थानांतील सरोवरें सांगा ?

उ०—गोडया पाण्याचीं—उलर, नैनीतल, कोलेर. खाऱ्या पाण्याचीं—सांबर, लोणार, पुलिकत, चिल्का, मंचर, धाबर.

प्र० ६५—हिंदुस्थानांतील धबधबे सांगा ?

उ०—घटप्रभेचा गोकाक येथें; शरावतीचा गिरसप्पा येथें व कावेरीचा शिवसमुद्र येथें.

प्र० ६६—हिंदुस्थानांतील हवामान सांगा.

उ०—दक्षिणेकडे हवा उष्ण आहे, उत्तरेकडे ती थंड होत होत गेली आहे. हिमालयाचा पायथा, काश्मीर येथें फार थंड हवा आहे. माळवा व पूर्व पश्चिम घाटांमधील प्रदेश, यांत साधारण थंड आहे. व पूर्व पश्चिम किनारा आणि सखल प्रदेश यांत उष्ण हवा आहे.

उ० ६७—हिंदुस्थानांतील थंड हवेचीं ठिकाणें सांगा.

प्र०—सिमला, महाबळेश्वर, माथेरान, सिंहगड, उटकमंड, अबूचा-पहाड, मसूरी, नैनीताल.

प्र० ६८ हिंदुस्थानांत सर्वांत जास्त पाऊस कोठें पडतो, मध्यम कोठें पडतो व सर्वांत कमी कोठें पडतो ?

उ—आसामांतील चेरापुंजी, बंगाल्यांतील खाशिया टेंकड्या येथें पाऊस जास्त पडतो ( ६०० इंच ); त्याच्या खालोखाल सह्याद्रीच्या माथ्यावर, आसपास व कोंकणांत पडतो. बंगाल व मध्यप्रांत येथें मध्यम पाऊस पडतो. सिंधप्रांतांतील ठठ्ठा व सक्कर येथें व पंजाब, राजपुताना येथें पाऊस अगदीं थोडा ( १० इंच ) पडतो.

प्र० ६९ हिंदुस्थानांतील मुख्य पिकें सांगा ?

उ०—संयुक्तप्रांत, बंगाल, कोंकण, पूर्व व पश्चिम किनाऱ्याजवळची जमीन येथें तांदूळ; महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र, नागपूर, गुजराथप्रांत येथें ज्वारी, बाजरी, हरभरे, तूर, करडी, जवस, भुईमुग, मिरची, गूळ; वऱ्हाड, गुजराथ, खानदेश, मध्यप्रांत, कर्नाटक, व महाराष्ट्राचा कांहीं भाग यांत कापूस पिकतो; बंगाल्यांत गळिताचीं धान्यें, ज्यूट; माळव्यांत अफू; आसामांत चहा; बहारप्रांतांत नीळ; महाराष्ट्र व उत्तर हिंदुस्थान येथें गहूं फार पिकतो.

प्र० ७०—हिंदुस्थानांतील खनिज पदार्थ कोणकोणत्या ठिकाणीं कोणकोणते सांपडतात ?

उ०—सोनें धारवाड–जिल्ह्यांत व म्हैसूर संस्थानांत; रुपें–कच्छप्रांतांत; लोखंड व दगडी कोळसा–बंगाल, ओरिसा, मध्यप्रांत; तांबें—हिमालयाच्या पश्चिमभागाचा पायथा, मध्यप्रांत, बंगाल; मोतीं–सीलोन व काठेवाडाजवळील समुद्रांत; हिरे–गोवळकोंडें व पन्ना संस्थान. मॅग्नानीज–मध्यप्रांत, विजगापट्टण; मीठ–पंजाबांतील मिठाचे डोंगर व सांबर सरोवर.

प्र० ७१—हिंदुस्थानांतील उद्भिज्ज पदार्थ सांगा ?

उ०—फळझाडें–आंबा, फणस, नारळ, सुपारी, वेलदोडे, पेरू, केळीं, संत्रें; इमारतीचीं झाडें–बाभूळ, लिंब, चंदन, जांभूळ, सागवान, खैर.

प्र० ७२—हिंदुस्थानांतील प्राणी सांगा ?

उ०—सिंह, वाघ, गेंडे, हत्ती, उंट, घोडे, गाई, बैल, म्हशी, मेंढया इ०

प्र० ७३—हिंदुस्थानांतील पोर्तुगीज व फ्रेंच यांच्या ताब्यांतील मुलूख सांगा !

३५७३

उ०—पोर्तुगीजांचे ताब्यांत—गोवें, दमण, दीव; फ्रेंचांचे ताब्यांत चंद्रनगर, यानांन, कारिकल, माही, पांडिचरी.

प्र ७४ हिंदुस्थानांतील इंग्लिश फौजेचीं ठाणीं सांगा ?

उ०—महू, निमच, बंगलोर, कानपूर, कामटी, चित्रळ; रावळपिंडी, खडकी, शिकंदराबाद इ०

प्र०७५—हिंदुस्थानांतील आयात निर्यात ( जाणारा ) माल सांगा ?

उ०—आयात—सोनें, रुपें, धातूंचे पत्रे, राकेल, साखर, स्टेशनरी-सामान, कापड, यंत्रें, काच, कागद, घडयाळें, मसाल्याचे पदार्थ; निर्यात—लोखंड, कापूस, धान्यें कातडीं, गोणपाट, लोंकर, इ०

प्र०७६- हिंदुस्थानसरकारचें उत्पन्न व खर्च सांगा ?

उ०—मीठ, अफू, कर, आगगाडया, पोष्ट जकात, इ० चें उत्पन्न सव्वा अब्जाहून जास्त व सैन्य, आरमार, नोकरांचे पगार वगैरेचा खर्च त्याहून थोडा कमी आहे.

प्र०७७—हिंदुस्थानांतील उंच सखल प्रदेश सांगा ?

उ०—हिमालयाचा प्रदेश, सह्याद्री, विंध्याद्री व पूर्वघाट यांमधील प्रदेश उंच आहे. गंगा, सिंधु, यांच्या कांठचा प्रदेश व पूर्व किनारा, पश्चिम किनारा हे प्रदेश सखल आहेत.

प्र०७८—हिंदुस्थानांतील पर्वत सांगा ?

उ०—हिमालय, हिंदुकुश, काराकोरम, हाला, सुलेमान, सह्याद्री, विंध्याद्री, सातपुडा, अरवली, निलगिरी व कार्डमम.

प्र०७९—हिंदुस्थानांतील पर्वतांतील खिंडी व शिखरें सांगा ?

उ०— खिंडी—बोलनघाट—सुलेमानांत, काराकोरम खिंड— काराकोरमांत ( जगांत उंच आहे ), जेलापला खिंड—हिमालयांत, खैबरखिंड—हिंदुकुशांत, पालघाटखिंड—सह्याद्रींत; शिखरें:—हिमालयांचीं—एव्हरेस्त-गौरीशंकर २९००० फूट, कांचनगंगा, धवलगिरी, नंदादेवी, नंगापर्वत सुलैमानचें- तक्तइ सुलैमान; अरवलीचें- अबूचा पहाड; सह्याद्रीचें मलयागिरी;

प्र० ८० हिंदुस्थानांतील मोठमोठयानद्या सांगा ?

उ०—गंगा, यमुना, सिंधू, ब्रह्मपुत्रा, शोणभद्र, नर्मदा, तापी, साबर-